## न्यायनिर्णय नि.क्र.९ सलग

(पारीत दिनांक २७/०३/२०२६)

आरोपीवर महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये खटला चालविण्यात आला.

२) आरोपीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. माझ्यासमक्ष निर्माण झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे ;

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- | --- |
| १. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय, दि. २५/०४/२०२४ रोजी संध्याकाळी ०७.०० वाजण्याच्या सुमारास मौजे आदगाव येथे आरोपीच्या राहत्या घराच्या पाठीमागील मोकळया जागेत आरोपी त्याच्या ताब्यात २ प्लॅस्टीक कॅन ज्यामध्ये एकुण ४५ लीटर गावठी हातभट्टीची दारु भरलेली असा एकुण किंमत रुपये ४७५०/- चा मुद्देमाल विना परवाना अवैधरीत्या विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःजवळ बाळगुन असताना मिळुन आला ? | नाही |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

### कारणमिमांसा

**मुददे क्रमांक १ व २ करिता :-**

३) अभियोगपक्षातर्फे पंच साक्षीदार म्हणुन तपासण्यात आलेला श्री. प्रविण गजानन नागवेकर (अ.सा.क्र.१) व सुदेश सुधाकर विलनकर (अ.सा.क्र.२) यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यांनी आपल्या साक्षीदरम्यान अभियोगपक्षाच्या केसचे कोणतेही समर्थन केलेले नाही. याउलट त्याने त्याचे अभीयोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीत हे स्पष्टपणे नाकारले की, पोलिसांनी त्याचे समक्ष दि.२५/०४/२०२४ रोजी सदरच्या ठिकाणी आरोपीच्या ताब्यातुन

सदरचा मुद्देमाल जप्त केला होता अगर तसा कोणताही जप्ती पंचनामा त्यांचे समक्ष केला होता. पंचनाम्यातील मजकुर त्याने स्पष्टपणे नाकारला आहे. एकंदरीत पाहता सदरचे दोन्ही साक्षदारांची साक्ष अभियोग पक्षास घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्यास काहीच उपयोगाची ठरली नाही. थोडक्यात पंच साक्षीदांराने फिर्यादीचे पुराव्याचे समर्थन केलेले नाही.

४) वरील दोन्हीही साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करित नसलेमुळे त्यांना उलटतपासाचे स्वरुपात विचारणेत येणारे प्रश्न विचारले. परंतु, त्याद्वारेही आरोपीविरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर आणणेस अभियोगपक्ष अपयशी ठरलेला आहे.

५) सरकारपक्षातर्फे दि.०६/०८/२०२४ रोजीच्या पृथ्थकरण अहवालावर आपली भिस्त ठेवली आहे. सदर पृथ्थकरण अहवालाचे अवलोकन केले असता तो अहवाल दिनांक १६/०५/२०२४ रोजीचा संदर्भ क्रमांक (Ref No. DET/112024/291/IFS) नुसार पाठविलेल्या वस्तुंबाबतचा असलेचे दिसते. त्या अहवालामध्ये गुन्हा रजिस्टर क्र. १२२/२०२४ चा उल्लेख करणेत आलेला आहे. परंतु, गुन्हा रजिस्टर क्र. १२२/२०२४ चे प्रकरणी जप्त मुद्देमालाचा नमुनाच प्रयोगशाळेला पाठविला होता हे दर्शविनारा सदर नमुना ताब्यात ठेवणारा संबंधीत अधिकारी प्रकरणी तपासलेला नाही.

६) तसेच सरकारपक्षाच्या हकीकतीप्रमाणे गुन्हा दिनांक २५/०४/२०२४ रोजी घडला व पृथ्थ्करण अहवालानुसार प्रकरणी जप्त मुददेमालाचा नमुना प्रयोगशाळला दिनांक १६/०५/२०२४ रोजी पाठविला. दरम्यानचे कालावधीमध्ये जप्त मुददेमालाचा नमुना कोठे, कशा परिस्थीतीमध्ये ठेवला होता व त्यावेळी त्या मुददेमालाचा ओळखीचा क्रमांक काय होता याबाबत कुठलाही पुरावा अभिलेखावर दाखल नाही. मुद्देमाल नमुना प्रयोगशाळेला पाठविताना तो ज्या स्थीतीमध्ये जप्त केला त्याच स्थीतीमध्ये प्रयोगशाळेला पाठविलेबाबत कोणताही पुरावा अभीलेखावर नाही. कथीत मुद्देमाल जप्त केलेचा दिनांक व त्यातील नमुना प्रयोगशाळेला पाठविलेचा दिनांक यातील कालावधी पाहता त्या कालावधीच्या दरम्यान मुददेमाल नमुन्यामध्ये छेडछाड होणेची शक्यता देखील त्यासंबधी पुरेसा पुरावा अभीलेखावर नसलेने नाकारता येत नाही. परिणामी, वादाकरिता जरी आरोपीच्या ताब्यातुन जप्त केलेल्या मुद्देमालाचाच आहे असे गृहित धरले तरी तो विश्वासपात्र ठरत नाही.

७) अशा परिस्थीतीत वरील विवेचनावरुन सरकारपक्षाच्या खटल्याचे सत्यतेबाबत साशंकता निर्माण होते. तशा शंकेचे निरसन करणारा कोणताही पुरावा अभिलेखावर नाही. परिणामी सरकारीपक्ष आरोपीने दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र गुन्हा केला असे संशयापलीकडे शाबीत करणेस असमर्थ ठरला आहे हे स्पष्ट होते. सबब, संशयाचा फायदा देत आरोपीची प्रस्तुत प्रकरणामधून निर्दोष मुक्तता करणे क्रमप्राप्त ठरते. म्हणून हे न्यायालय मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष नकारार्थी देवून मुददे क्रमांक २ साठी पुढीलप्रमाणे आदेश पारित करतो :–

## आ दे श

१) आरोपी राजेंद्र दत्तात्रय तोडणकर, यांची भारतीय नागरी सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम १९४९ चे कलम ६५(ई) अंतर्गत शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयातुन दोषमुक्त करण्यात येते.

२) आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३) प्रकरणी जप्त मुददेमाल २ प्लॅस्टीक कॅन ज्यामध्ये एकुण ४५ लीटर गावठी हातभट्टीची दारु भरलेली हे अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे योग्य त्या विल्हेवाटीकरिता अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रायगड अलिबाग यांचेकडे पाठविणेत यावे.

४) भारतीय नागरी सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ च्या पुर्ततेकामी आरोपीने रु. १५,०००/– ची जामीन दयावयाचा आहे.

५) प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, रायगड–अलिबाग यांचेकडे पाठविण्यात यावी

(सदरचा न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला. )

SAMEER KADER SHAIKH Digitally signed by SAMEER KADER SHAIKH Date: 2026.03.27 18:33:10 +0530

दिनांक– २७/०३/२०२६ (एस.के.शेख)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीवर्धन